# ।। करमी नर को अंग ।।

## मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ क्रमी नर को अंग लिखंते ।।

।। कवत ।।

जळ पाहण घी कूप ।। झूट गुल आग न झेले ।।
बाळक संग जवान ।। हैण नर सेज न खेले ।।
बग तर छिवे न घाव ।। आंधळो चाव न देखे ।।
लाडू किया अनेक ।। चाख लेत बिन पेखे ।।
काळी ऊन न रंग चडे ।। लाखां करो ऊपाय ।।
यूँ क्रमी नर सुखराम के ।। ग्यान भिदे नही आय ।।१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,कर्मी मनुष्य ज्याचे आधीचे नरकीय कर्म आहे तसेच आणखीही नरकीय कर्म करुन राहिला आहे,अशा कर्मी मनुष्याच्या बाबतीत सांगून राहिले आहे.जसे दगडावर पाणी पडले किंवा दगड पाण्यात राहिला तरीही दगडाला पाणी भेदू शकत नाही.अशा प्रकारे कर्मी मनुष्यात ज्ञान भेदत नाही आणि कुपा तुप ठेवण्याचे भांडे असते,त्याला तुप भेदत नाही खोटा गुल म्हणजे चकमक दगडापासून निघालेल्या चिंगारी पासून काटसावरीच्या कापसाला आग पकडते म्हणजे काटसावरीचा कापूस खोटा असेल म्हणजे कापसाच्या रुईसारखे आही तर आग पकडत नाही तसेच कर्मी मनुष्य ज्ञान धारण करीत नाही.जसे बालकासोबत जवान आणि हिजडा स्त्री सोबत संसाराचा खेळ,खेळू शकत नाही तसेच कर्मी मनुष्य ज्ञान धारण करु शकत नाही,जसे चिलखत(कवच)घातल्यावर घाव लागत नाही,तसेच नरकीय कर्मी मनुष्याला ज्ञान लागत नाही.जसे आंधळा मनुष्य आनंद देणारे इच्छा असल्यावरही खेळ बघू शकत नाही, तसेच कर्मी मनुष्य ज्ञान घेऊ शकत नाही,अनेक प्रकारचे लाडू बनविले,परंतु खाल्ल्या-शिवाय पारख होणार नाही.जसे काळ्या घोंगडीवर दुसरा रंग चढू शकत नाही,तसेच कर्मी मनुष्याला ज्ञान लागत नाही.लाखों उपाय केले तरीही कर्मी मनुष्याला ज्ञान भेदू शकत नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।१।।

आक ईख आदीत ।। आँख कारी यूँ कर्मी ।।
ज्यूँ मर्कट सिर्पाव ।। अई पोपा कूं चिर्मी ।।
सर्प दुध बिष होय ।। मरे खंर मिसरी खावे ।।
चहूँ दिस सायर नीर ।। प्रेत प्यासो दु:ख पावे ।।
यूँ क्रम हीण के नही बणे ।। साध संगत को जोग ।।
दाख फळया सुखराम के ।। हुवे काग के रोग ।।२।।

जसे मदार पिणाऱ्या मनुष्याला जसे मदारच्या विषेचा नशा होऊन जातो तशी कर्मी जीवाला भोग कर्माची नशा राहते,त्याला योगाचे ज्ञान चांगले वाटत नाही.मोतीबिंदुचे ऑपरेशन

केलेला मनुष्य सुर्याचा प्रकाशात राहू शकत नाही,असाच कर्मी जीव ज्ञानात राहू शकत नाही.जसे माकडाला चांगले कपडे घातले तरीही ते माकड त्याला नखांनी,दातांनी फाडून फेकून देतो,अशा तऱ्हेने कर्मी मनुष्य ज्ञानाला फेकून देतो.मारवाड देशात अरड पोपा नावाचे एका जातीचे लोक आहेत,त्यांना कोणी चिर्मी(गुंज)दाखवून दिली तर,ते अरड पोपा गाव सोडून पळून जातात,असेच कर्मी मनुष्याला कोणी ज्ञान सांगेल तर,अरड पोपा सारखे पळून जातात.जर कोणी सापाला दुध पाजले तरीही तो साप,त्या दुधाचे विष बनवून देतो,असेच कर्मी मनुष्याला ज्ञान सांगितल्यावर,तो कर्मी मनुष्य अमृतरुपी ज्ञानाला विष बनवून देतो.खडीसाखर गाढवाला खाऊ घातल्यावर,ते गाढव मरुन जाते, असेच कर्मी मनुष्य ज्ञानात नुकसान समजतो.चारी बाजूने मोठ मोठ्या नद्या आणि तलाव पाण्याने भरले आहेत,परंतु प्रेताला(भुताला)ते पाणी न मिळाल्याने ते तहानलेले दुःखी राहतात.भूत,प्रेताला नद्या आणि तलावाचे पाणी पिण्यास मिळत नाही,तसेच कर्मी मनुष्याला साधु संगतीचा योग मिळत नाही.जसे द्राक्ष वैशाख महिन्यात फळतात,त्यावेळी कावळ्याचा तोंडात रोग होऊन जातो,ज्यामुळे तो द्राक्ष खाऊ शकत नाही तसेच साधुच्या संगतीत कर्महीन मनुष्याच्या आड्वे कोणते न कोणते विघ्न येऊन जाते,ज्याचाने त्याचा साधूच्या संगतीचा योग जुडत नाही,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।२।।

ज्हाँ आन की सेव ।। साध की संगत न भावे ।।
जेसे जुर को जोर ।। रूच अन की मिट जावे ।।
कृमी तजे कपूर ।। मेल माखि नित जोई ।।
ब्होता दूधाँ धोय ।। कोयला ऊजळ न होई ।।
सदा सजीवण जीव कूं ।। सुन पाती अन सूँ मरे ।।
युँ क्रम ऊदो सुखरामजी ।। ब्रम्ह भक्त केसें करे ।।३।।

जेथे ज्यांच्या घरात अन्य देवतांची भक्ति होते,त्याला साधू संगती चांगली वाटत नाही. जसे कोणाला ताप राहिला तर,त्या तापाच्या जोराने अन्नाची रुची मिटून जाते,अन्न गोड लागत नाही.अन्नाची दुर्गंधी त्याला माहित पडते,तसेच ज्याला कर्मरुपी ताप आहे, त्याला अन्नरुपी संताची संगत चांगली वाटत नाही.कुर्मी(किडे) कापुरचा त्याग करतात, तसेच कर्मी मनुष्य साधू,संताचा त्याग करतात व या माशा नेहमी मलीन,घाण जागेवर येऊन बसतात, अशाच प्रकारे कर्मी मनुष्य नेहमी वाईट लोकांचा संग करणे चाहतात. कोळशाला दुधाने कितीही धुतले तरीही तो कोळसा सफेद होत नाही,असेच कर्मी मनुष्याला कितीही ज्ञान सांगितले,तरीही त्याचा कोळशा सारखा काळेपणा जात नाही, अन्न नेहमी सर्व जीवांचे संजीवण आहे,परंतु तेच अन्न सन्निपात(एक प्रकारचा ज्वर) झालेल्या मनुष्याला दिल्यावर तो मनुष्य मरुन जातो,असेच ज्याचे आधीचे नरकीय

कर्म उदीत होऊन गेले आहे,असा कर्मी मनुष्य सतस्वरुप ब्रह्मभक्ति कशी करेल?असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।३।।

**ऊदे भाण प्रकास ।। जीव अेता नही राजी ।।**
**गुघू तस्कर चोर ।। चमक प्र भयँग बेराजी ।।**
**दीयो मान मुसाल ।। जोत हीरा की जावे ।।**
**यूँ पतवृता कूं देख ।। बेसीया ब्हो दुःख पावे ।।**
**यूँ हरजन मंड प्रगटयाँ ।। क्रमी नर मुर्झाय ।।**
**ग्यान चक्र सुखराम क्हे ।। लगे कन फटी माय ।।४।।**

सुर्य उगल्यावर जीव खुश होतात, परंतु घुबड,तस्कर (चोर),चमक (पाकोडी),पर (वटवाघुळ),भुजंग(सर्प)हे नाराज होतात.दिपक,मशाल,हिऱ्यांची ज्योती सूर्य प्रकाशाने नाही सारखे होऊन जातात,पतीव्रतेला पाहून वेश्येला दु:ख होते,अशा प्रकारे या पृथ्वी–वर हरिजनाला प्रगट झालेले पाहून,कर्मी मनुष्य कोमेजून जातो,हरिजनाच्या ज्ञानाचे चक्र कर्मी मनुष्याच्या कानपटीत लागते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।४।।

।। इति क्रमी नर को अंग संपूरण ।।